वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)

२) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.

३) मुख्याध्यापक, माध्यमिक वियालय लांडेवाडी यांचे दि.२२/०६/२०१७ रोजीचे पत्र.

४) मा. लेखाधिकारी यांचेकडील दि.१६/३/२०१७ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.

५) मा. शिक्षणाधिकारी यांचेकडील दि.११/ ०७ /२०१७ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/५८८/१७
दि. ११/ ०७ /२०१७

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृतीबाबत.
श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक (संगणक क्र.५९४६)

आदेश,

श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक माध्यमिक विदयालय लांडेवाडी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि. २०/१/१९८६ रोजी रूजू झालेले आहेत. श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक, यांची जन्मदिनांक २१/८/१९५९ अशी असून त्यांच्या वयास दिनांक २०/८/२०१७ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांना ३१/८/२०१७ रोजी मध्यान्होतर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल. तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक हया दिनांक ३१/८/२०१७ रोजी महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैयकीय अग्रीम तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र. ४ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही परंतु त्यांचे संदर्भात भविष्यात इतर काही लेखा परीक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम संबंधिताचे निवृत्ती वेतनामधुन वसूल करणेस अधिन राहुन रूजु दिनांक दि. २०/१/१९८६ या प्रमाणे नोंद घेणेत यावी..

सबब, मी, शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी- ४११ ०१८, उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांना दिनांक ३१/०८/२०१७ रोजी मध्यान्होतर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.शिराळ सुरेश वासुदेव, मुख्याध्यापक
माध्यमिक वियालय लांडेवाडी

प्रत:- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष.(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४
४) माध्यमिक विधालय लांडेवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner